पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ४६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २९/१२/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उत्पन्नाचा आढावा**

**विषय क्र. १२३५**

दि. १५/१२/२००९ ते २१/१२/२००९ अखेर आयातकर कार्यालयाचा जमा उत्पन्नाचा, रहदारी व बिगरजकात पकडलेल्या वाहनांचा व दंडात्मक कार्यवाहीबाबत मा.आयातकर प्रमुख यांचे क्र. ३९७० दि. २३/१२/२००९ ने पाठविलेला तपशील माहितीसाठी.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्रं. १२३६**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पाठविलेला साप्ताहिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. क्षेत्रीय अधिकारी घन कचरा व्यवस्थापन यांचे क्र.एसडब्ल्युएमओ/१५१४ दि. १९/१२/२००९ चे पत्र

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्रं. १२३७**

मा.अक्रुर कुदळे व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. १८/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२९ धायरी उज्वल टेरेस रायकरनगर येथील ॲमिनिटी स्पेस विकसित करणे त्याअंतर्गत स्विमिंग टँक बांधणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, १०.पथ. १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस–२), पान क्र. २३२, अ.क्र. ३१८, लगड मळा ते डी.एस.के.रोड ग्राऊट करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १२९ धायरी उज्वल टेरेस रायकरनगर येथील ॲमिनिटी स्पेस विकसित करणे त्याअंतर्गत स्विमिंग टँक बांधणे | --- | २० लाख |

**विषय क्रं. १२३८**

मा.अविनाश जाधव यांचे दि. १८/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ८३ स्वारगेट पोलिस लाईन येथे संपवेल बांधणेसाठी र.रुपये २२ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक , ५.लोकारोग्य, पान क्र. १२८, अ.क्र. ८१, शहरात स्मशान भुमिमध्ये विकासाची कामे करणे. (यादी क्र.एस–२४), पान क्र. २४७, अ.क्र. २३, वॉर्ड सभा आरोग्य कोठीमार्फत नागरिकांना थेट सुविधा देणे.(एकूण तरतूद रुपये ७ कोटी) | २२ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ८३ स्वारगेट पोलिस लाईन येथे संपवेल बांधणे | --- | २२ लाख |

Unregistered

**विषय क्रं. १२३९**

मा.विकास दांगट यांचे दि. २१/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १३० कै.चंद्रकांत दांगट शाळेच्या डी.पी.रोडच्या कडेने अर्धवट आर.सी.सी.वॉलचे काम पूर्ण करणेसाठी र.रुपये ३७.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र.१३४, अ.क्र. २, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरी करणे, (यादी ए-२), पान क्र. २१९,अ.क्र.४३, वडगांव बुाा स.क्र. ५२ बेंगलोर हायवेजवळील कल्व्हर्ट बांधणे | ३७.५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १३० कै.चंद्रकांत दांगट शाळेच्या डी.पी.रोडच्या कडेने अर्धवट आर.सी.सी.वॉलचे काम पूर्ण करणे | --- | ३७.५० लाख |

**विषय क्रं. १२४०**

मा.सुनिल बनकर व मा.विजय देशमुख यांचे दि. २२/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९४ मध्ये खालील कामे करणेसाठी र.रुपये ७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, १०.ख.वाहतुक नियंत्रण, पान क्र. १५०, अ.क्र. ५१, पुणे सोलापूर रस्ता (आकाशवाणी ते शेवाळवाडी जकातनाका) रस्ता रुंदीकरण करणे (एकूण तरतूद रुपये १ कोटी ५० लाख ) | ७५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) आकाशवाणी ते गोंधळेनगर हायटेंशन तारा हलविणे | --- | ५० लाख |
| २) आकाशवाणी सातववाडी गोंधळेनगर रस्त्यातील धोकादायक विद्यूत पोल हलविणे | --- | २५ लाख |

UnRegistered

**विषय क्र. १२४१**

मा. सौ. रत्नप्रभा जगताप व मा. सौ. अश्विनी कदम यांचे दिनांक २२/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र.९७ महादजी शिंदे छत्री मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.५० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९ -२०१० चे अंदाजपत्रक, १० ख वाहतूक नियंत्रण पान पा.क्र.१५० अ.क्र.४६, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे. ( यादी क्र.एस-३० ) पान क्र.२६३,अ.क्र.९, पुणे शहरातील पार्किंग रिझर्व्हेशनच्या प्रमुख जागा ताब्यात घेऊन बी.ओ.टी. तत्वावर यांत्रिक पार्किंग विकसित करणे. | ५० लाख | - - - |
| नवीन सुचविलेली कामे | | |
| १)स.नं.५८/२आझाद नगर येथील गल्ली मध्ये इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | ५ लाख. |
| २) कपिल वुडरोज सोसायटी समोरील रस्ता डांबरीकरण करणे. | --- | ७ लाख. |
| ३) क्रुट मेमोरियल शाळेसमोरील रस्ता डांबरीकरण करणे. | --- | ४ लाख |
| ४) स.नं.६३/८ शिर्के गल्लीमध्ये डांबरीकरण करणे. | --- | ५ लाख |
| ५) स.नं.६३/३/४ मोगरे वस्ती मध्ये डांबरीकरण करणे. | --- | ४ लाख |
| ६) वॉर्ड क्र.९७ मधील ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी बकेट खरेदी करणे. | --- | ४ लाख. |
| ७) शांतीनगर मधील अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे. | --- | ४ लाख. |
| ८) माने वस्ती मध्ये मुख्य रस्त्यावर विद्युत पोल व दिवे बसविणे. | --- | ३ लाख. |
| ९) ऑक्सफोर्ड व्हिलेज सोसायटी ते कारंजे चौक इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | १० लाख |
| १०) वॉर्डात विविध चार ठिकाणी हायमास्ट बसविणे. | --- | ४ लाख |

**विषय क्र. १२४२**

मा. अनिल जाधव यांचे दिनांक १६/१२/२००९ चे पत्र.

दिनांक १०/११/२००९ पासून दोन महिने मा. स्थायी समिती सभांना उपस्थित राहू शकत नाही. तरी कृपया वरील कालावधीत रजा मान्य करण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १२४३**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ७/६/२००९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ०३/१०/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/५७१ दि. १८/१२/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ३,२१,५५९/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. १२४४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १४/६/२००९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १०/१०/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/५७२ दि. १८/१२/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २,७१,४४८/- चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १२४५**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील हडपसर संपर्क कार्यालयाकडील हडपसर मधील समाविष्ट गाव ससाणेनगर विभागाच्या सन १९९९-२००० मधील मिळकतकराच्या ठरावबंदाची व तदनुषंगिक इतर कागदपत्रांची तपासणी केली असता आढळून आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/५६६ दि. १८/१२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ६० सन २००९-२०१० चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्रं. १२४६**

ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र व महिला बचत गटासाठी प्रशिक्षण केंद्र स. नं. २१ पार्ट वडगांवशेरी पुणे येथे बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार सोहम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २७,९८,१६०=१० पेक्षा १६.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २३,३१,९८६=६३ पर्यंत अधिक विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट, लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/६५० दि. १९/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. १२४७**

पुणे सिंहगड रस्त्यावर धायरी फाटा ते नवीन कॅनॉल दरम्यान उड्डाणपूल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे. केईटीआय कन्स्ट्रक्शन ( इंडिया ) लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २८,१०,४८,८६३/- पेक्षा ७.२०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३०,१२,८४,३८१=०० पर्यंत अधिक एस्कलेशन व बाजार भाव वाढ सुत्रानुसार सिमेंट, लोखंड, डांबर इ. मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/वि.प्र./जनेराशपुअ क्रं २/६५१ दि. २१/१२/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. १२४८**

वॉर्ड क्र. ७२ मधील गणेश पेठ, रविवार पेठ येथे विविध ठिकाणी व नागझरी नाल्यामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे. अमित एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४०,००,०००/– पेक्षा १०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३५,९९,९९३=७० पर्यंत अधिक भाववाढ व विशेष भाववाढ ( स्टार रेट ) सुत्रानुसार होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त ( ज ) यांचे क्र. मआ/वि.अ/मलनि/६५२ दि. २३/१२/२००९ चे पत्र.

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्रं. १२४९**

चिखली जलशुध्दीकरण केंद्र येथे फिल्टर बेड वॉशिंगच्या पाण्याचा पुनर्वापर करणेकरीता टाकी बांधणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार श्री. संताजी आर कदम यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु. २९,९८,१८४/– पेक्षा ११.१% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २६,६५,३८५=५८ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति. महापालिका आयुक्त ( ज ) यांचे क्र. मआ/वि.अ/पा.पु./६५३ दि. २३/१२/२००९ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्रं. १२५०**

पुणे पेठ एरंडवणा टी.पी.स्किम १ फा.प्लॉट नं. ११० वरील बांधकामाबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/६२९ दि. ७/१२/२००९ चे पत्र.

(टिप :– सदर विषयाचा विचार १५ दिवसानी करावा असे दि. १५/१२/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १२५१**

सन २००९–१० सालासाठी आयातकराचे अनुसूची १ (नियम ४) मध्ये नमूद केलेल्या वस्तूंवर कमाल दरापर्यंत वाढ करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/ओ/५०१ दि. ४/११/२००९ चे पत्र.

(टिप :– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २३/१२/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. १२५२**

मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.चंद्रकांत कदम यांचे दि. २९/१०/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १५९१ दि. ७/१०/१९९८ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे महानगरपालिका जकात नाक्यासाठी मौजे बावधन खुर्द, ता.मुळशी स.क्र. ६४ पैकी अंदाजे ७२४५ चौ.मी. जागा संपादन करणे)

(टिप :– सदर विषयाचा पुढील सभेत करावा असे दि. २३/१२/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

UnRegistered